विशेष दिवाणी दावा क्र.६१/२०२१
आय.ए.क्र.२/२०२२

<u>आदेश निशाणी क्र.५४ वर</u>

1. प्रतिवादी क्र.१ ने सदरचा अर्ज त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

2. प्रतिवादी क्र.१ चे म्हणणे असे की, सदरच्या दाव्याबाबतची जरुर ती माहिती व कागदपत्रे वेळेवर मिळू शकली नाही व कागदपत्रे उपलब्ध होताच त्यांनी अर्जासोबत कैफियत सविस्तर दिलेली आहे. न्यायाच्या दृष्टीकोनातून कैफियत स्वीकारण्यात यावी अन्यथा त्याचेवर अन्याय होणार असून त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्याचे मालकी हक्क व हितसंबंध गुंतलेले आहेत. म्हणून विना कैफियत आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती केली आहे.

3. वादीने सदर अर्जास म्हणणे देवून तीव्र आक्षेप घेतलेला आहे. प्रतिवादीचा अर्ज, त्यातील मजकूर हा खरा व बरोबर नाही. प्रतिवादीने दिलेला अर्ज त्यांना मान्य व कबूल नाही. सदरच्या अर्जात प्रतिवादीने कोणतेही संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. प्रतिवादी दाव्याचे कामकाज लांबविण्याचा प्रयत्न करीत आहेत म्हणून अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

4. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींना अनेक संधी देवूनही कैफियत दाखल केली नाही म्हणून शेवटी त्यांचे विरुध्द विना कैफियतचा आदेश झालेला आहे. आज रोजी प्रतिवादी हजर आहेत. प्रतिवादी हे कैफियत देण्यास तयार आहेत. प्रतिवादी यांना म्हणणे देण्याची संधी न दिल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. प्रतिवादी क्र.१ याचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

सही/-

दि. १४/०१/२०२२

( अर्चना श्रीपत नलगे )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment.

| | |
|---|---|
| a Name of the Stenographer | : Shirsikar V.G. |
| b Court | : 2nd Jt. Civil Judge S.D.Pandharpur |
| c Date of Judgment | : 14/01/2022 |
| d Judgment signed by P.O. On | : 14/01/2022 |
| e Judgment uploaded on | : 14/01/2022 |